COURT OF SMALL CAUSES
L. T. MARG, DHOBI TALAO, MUMBAI – 400 002
Telephone No. :- 22088700 / 22088749
Email : scc-mumbai@bhc.gov.in

-:TENDER NOTICE:-

Sealed Quotations are being invited for the purchase of items useful for the Judicial Officers and Office of the Small Causes Court, Mumbai, Lokmanya Tilak Marg, Dhobi Talao, Mumbai – 400 002, Head Office and Bandra Branch. The tenderers should submit their quotations in a sealed envelope as per the given terms and conditions. The list of items to be purchased is given per **Annexture 'A'**.

However, inerested tenderers should send their tenders in a sealed envelope with the words **"Tender for the purchase of useful items for judicial officers and office use"** Written in large letters on the top of the envelope and send them to the address **" Registrar, Court of Small Causes, Lokmanya Tilak Marg, Dhobi Talav, Mumbai – 400 002"** on or **before 5.00 PM on June 30th 2026.** Tenders received after the date will not be considered. Detailed information about the said tender is available on the Website of the court. http://districts.ecourts. gov.in/india/maharashtra/mumbai-smallcause-court/tender.

The final authority to accept or cancel/reject the published tender shall be with the Hon'ble Chief Justice, Court of Small Causes, Mumbai.

Court of Small Causes, Mumbai

Date :- 18th June, 2026

Potdar

(R. L. Potdar)
Additional Registrar

लघुवाद न्यायालय, मुंबई
लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२
–: दरपत्रक सुचना :–

दिनांक – १८ जून, २०२६

न्यायिक अधिकारी व कार्यालयासाठी लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी जाहीर दरपत्रके सादर करण्यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे:

१.	इच्छुक संस्था/कंपन्यानी आपले दरपत्रक विहित नमुन्यात व वस्तूंच्या पुर्ण माहितीसह मोहरबंद लखोटयात सादर करून त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात **"न्यायिक अधिकारी व कार्यालयासाठी उपयोगी वस्तू खरेदीसाठीचे दरपत्रक"** असे लिहून ते **'प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई ४०० ००२'** यांच्याकडे दिनांक ३० जून, २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवावे. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२.	सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम–२००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व सुरक्षा ठेव रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल. ज्या दरपत्रकधारकांकडे सदरचे प्रमाणपत्र नसेल तर त्यांना दरपत्रक शुल्क रूपये २,०००/– (विना परतावा) व सुरक्षा ठेव रक्कम रूपये १०,०००/– (परतावा योग्य व्याजरहीत) या रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर देणे गरजेचे आहे. सदर डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर हे **''प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई"** यांच्या नावे द्यावयाचा आहे.
३.	दरपत्रकधारकाने दरपत्रक भरतांना सर्व करांसहीत (With All G.S.T.) रक्कम नमूद करावी तसेच सर्व करांची रक्कम तपशिलवार दरपत्रकात नमूद करावी.
४.	समितीच्या बैठकीत दरपत्रके उघडण्याच्या वेळेस दरपत्रक धारकांनी आपल्या दरपत्रकात नमुद केलेल्या वस्तूंचे नमुना वस्तू (Sample Piece) पडताळणीसाठी कार्यालयात घेऊन येणे बंधनकारक राहील.
५.	दरपत्रकधारकारने दरपत्रकावर संस्था/कंपनीचे नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक, ई–मेल आयडी नमुद करणे आवश्यक आहे.
६.	दरपत्रक धारकांची निवड झाल्यानंतर त्यांच्याशी झालेल्या दरपत्रकातील दरानुसार सदरची खरेदी करण्यात येईल. तसेच ठरलेल्या अटी व शर्तीनुसारच खरेदी होईल आणि निवड झाल्यानंतर वस्तूंचा पुरवठा पुढील १५ दिवसात करणे आवश्यक आहे. १५ दिवसात पुरवठा न झाल्यास सदर निवड झालेल्या संस्था/कंपनीला रद्द करण्यात येईल. तसेच निवड झालेल्या संस्था/कंपनीकडून खरेदी केलेल्या वस्तू पुरवठा झाल्यावर वस्तू सुस्थितीत आहे की नाही याची तपासणी करून सुरक्षा ठेव रक्कम १० दिवसानंतर परत करण्यात येईल.

७.	वस्तूंची गुणवत्ता आणि किंमती पडताळणीचे पूर्ण अधिकार खरेदी समितीला राहतील. वस्तूंची किंमत कमी असेल परंतू वस्तूची गुणवत्ता चांगली नसल्यास सदर वस्तू नाकारण्याचे अधिकार खरेदी समितीला राहतील. तसेच, वस्तूंची संख्या कमी अधिक करण्याचे अधिकार खरेदी समितीला राहतील.
८.	वस्तूंचा स्वीकार करतांना जर वस्तूंमध्ये काही त्रुटी म्हणजेच तुटलेले अथवा वस्तूंचा दर्जा व गुणवत्ता खराब असल्यास, त्या वस्तू परत देण्यात येतील व त्याऐवजी उत्तम दर्जाची नवीन वस्तू पुरवठादारास देणे बंधनकारक राहिल.
९.	दरपत्रकधारकाचे/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकधारकाला रक्कम अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेश (Cancelled Cheque) तसेच बँकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान अथवा अदाता नोंदणी प्रमाणपत्र यांची छायांकीत प्रत देणे अनिवार्य आहे.
१०.	दरपत्रक मंजूर झालेल्या संस्थेने सदरच्या उपयोगी वस्तू या न्यायालयातील मुख्य कार्यालयात व वांद्रे शाखा येथे विना वाहतूक शुल्क पोच करावयाचे आहे.
११.	मा. मुख्य न्यायाधीश लघुवाद न्यायालय, मुंबई यांनी घेतलेले निर्णय अंतिम राहतील.

RLPotdar

(आर. एल. पोतदार)
अप्पर प्रबंधक
लघुवाद न्यायालय, मुंबई

परिशिष्ट 'अ'

न्यायिक अधिकारी व कार्यालयासाठी लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तुंची यादी

अ.क्र	आवश्यक वस्तू	संख्या	वस्तूंचा तपशील
१.	लहान आकार असलेली प्लास्टिकची कचराकुंडी, पायाने उघडणारी (५ लीटर)	२० नग	(कंपनी–सेलो) पायाने उघडणारी, गोलाकार,
२.	एलईडी व्हाईट ट्युबलाईट	२०० नग	(सिस्का/फिलिप्स) २० वॅट, क्षमता– 1100 x 23 x 33
३.	डायसवरचा लाल रंगाचा कपडा	१०० मीटर	रंग – लाल कापडाची गुणवत्ता चांगली,
४.	चहाचा थर्मास	२० नग	(कंपनी – मिल्टन) क्षमता –500 ML
५.	प्लास्टिक फुलझाडू	२० नग	(कंपनी – गाला) प्रकार – फेबरीक आणि प्लास्टिक आकार – XXL
६.	खराटा	३० नग	कोकोनट मिन्ट
७.	मॉप	२० नग	(गाला कंपनी) आकार – 50 x 8 x 35 से.
८.	ॲसिड (१ लीटर)	७० नग	चांगल्या दर्जाचे
९.	टेबल पुसण्याचा डस्टर (टू कलर)	२०० नग	प्रकार – कॉटन, आकार – 22 x 22 चौसेमी
१०.	फिनाईल (१ लीटर)	१०० नग	(कंपनी–सनी) चांगल्या दर्जाचे,
११.	सफेद नॅपकिन	१०० नग	कापडाचा प्रकार –१०० % कॉटन, आकार – 16 x 22
१२.	घड्याळ	२५ नग	(अजंता कंपनी)
१३.	हॅण्डवॉश (५ लीटर)	१५ नग	उत्तम दर्जाचे
१४.	पाण्याचा जग (२ लीटर)	१० नग	प्रकार– प्लास्टिक चांगल्या प्रतीचे
१५.	घड्याळाचे सेल	१२० नग	चांगल्या प्रतीचे, (पॅनासोनिक/एवरीडे)
१६.	टेबलवरील कपडा	४० मीटर	रंग – मरुन
१७.	छोटी बादली (५ लीटर)	२० नग	प्लास्टिक गोलाकार चांगल्या प्रतीची
१८.	डांबरगोळ्या (२५० ग्रॅम पॅकेट)	१५० नग	चांगल्या प्रतीच्या

१९.	टेबल बेल	१५ नग	स्टेनलेस स्टील
२०.	शोभेच्या लहान आकाराच्या कुंड्या	८० नग	चांगल्या प्रतीच्या लहान, गोलाकार
२१.	चहाचे कप	१०० नग	चांगल्या प्रतीचे लहान
२२.	पाण्याचे काचेच ग्लास	१०० नग	चांगल्या प्रतीचे, गोलाकार
२३.	टिशु पेपर्स (पॅकेट)चे	१२० नग	चांगल्या प्रतीचे
२४.	मग	२० नग	चांगल्या प्रतीचे
२५.	आरसा	२० नग	प्लास्टिक फ्रेम लांबी – १ फुट ६ इंच रुंदी – १ फुट २ इंच
२६.	ॲडव्होकेट बॅग	४० नग	चौकोनी, रंग– काळा आकार – 57 x 36 x 40 से.मी
२७.	ॲक्रेलिक पॅड	१० नग	पारदर्शक, आकार– 18"x 24" जाडी- 8 मीमी
२८.	वायपर	२० नग	४ फुट उंचीचे, प्लास्टिक
२९.	कचरा काढण्याची सुपडी	३० नग	उत्तम दर्जाची
३०.	पायपुसणी	५० नग	उत्तम दर्जाची
३१.	चहाचे झाकण (टी कोस्टर)	१०० नग	गोलाकार, प्लास्टिक
३२.	पेन स्टॅण्ड	३० नग	गोलाकार, उत्तम दर्जाचे
३३.	मेलेमाईनच्या मोठ्या आकाराच्या प्लेट	३० नग	गोलाकार, उत्तर दर्जाच्या
३४.	मेलेमाईनच्या लहान आकाराच्या प्लेट	३० नग	गोलाकार, उत्तम दर्जाच्या
३५.	मेलेमाईनच्या बाऊल	२० नग	गोलाकार, उत्तम दर्जाचे
३६.	स्टीलचे चमचे	५० नग	चांगल्या प्रतीचे
३७.	न्यायालयातील व दालनातील दरवाजाचे पडदे	For New Building -१० For Old Building -१०	Curtain Material – plain, silk and thik Colour -Combination of ceream and coffee Non Transparent Closer Type eyelet rings For New Building लांबी - 6.5 (साडेसहा) फुट रुंदी - ४ (चार) फुट For Old Building- लांबी - ७.५ (साडेसात) फुट रुंदी - ४ फुट ७ इंच

३८.	न्यायालयातील व दालनातील खिडकीचे पडदे	For New Building -१० For Old Building -१०	Curtain Material – plain, silk and thik Colour -Combination of ceream and coffee Non Transparent Closer Type eyelet rings For Old Building लांबी –४.५ (साडेचार) फुट रुंदी– ४ फुट ७ इंच For New Building लांबी – ५.५ (साडेपाच) फुट रुंदी– ३.५ (साडेतीन) फुट
३९.	पडद्याचे लोखंडी रॉड	५ नग	आकार – १ इंच व्यास – ०.२५ मी लांबी – १२ फुट स्टेनलेस स्टील
४०.	पडद्याचे ब्रॅकेट (पडद्याचे रॉड लावण्यासाठीचे दोन्ही बाजूचे ब्रॅकेट)	५० नग	आकार – १ इंच व्यास – ०.२५ मी.

Potdar

(आर. एल. पोतदार)
अप्पर प्रबंधक
लघुवाद न्यायालय, मुंबई